## पोदार कॉलेजच्या उपक्रमातून देण्यात आला सामाजिक संदेश



# समुद्रकिनाऱ्यांची स्वच्छता आपली जबाबदारी!

**अवनी परांजपे,** पोदार कॉलेज
**muntainbox**@gmail.com

माटुंगा येथील **पोदार कॉलेजमध्ये** साजरा होणारा 'एनिग्मा' हा फेस्ट विविध उपक्रमांमुळे नेहमीच लक्षवेधी ठरतो. 'एनिग्मा २०२२'च्या अंतर्गत 'बीच क्लीन अप' या उपक्रमाचं आयोजन नुकतंच करण्यात आलं होतं. मल्हार कळंबे यांच्या 'बीच प्लीज इंडिया' या संस्थेच्या सहयोगाने उपक्रम पार पडला. 'जागतिक पर्यावरण दिना'चं औचित्य साधत हा उपक्रम आयोजित करण्यात आला होता.

'बीच प्लीज इंडिया' हा ग्रुप २०१७मध्ये काही तरुण मंडळींनी एकत्र येऊन सुरू केला. आठवड्यातून एकदा विविध समुद्रकिनारे स्वच्छ करणं, हेच त्यांचं ध्येय आहे. या उपक्रमातून मिठी नदी स्वच्छ करण्याचं आव्हान पोदार कॉलेजच्या विद्यार्थ्यांनी स्वीकारलं आहे. विद्यार्थ्यांनी मोठ्या संख्येने उपक्रमाला हजेरी लावली. 'ही अनेकांची पहिली वेळ होती. पण सगळे अगदी मनापासून काम करत होते. हा अनुभव समाधान देणारा होता', असं कॉलेजचा विद्यार्थी अद्वैत राजाध्यक्ष सांगतो.

प्लास्टिकच्या पिशव्या, बाटल्या, जाळी, काचा अशा अनेक हानिकारक गोष्टी जमा करत उपक्रमातून स्वच्छ समुद्रकिनाऱ्यांचं महत्त्व पटवून देण्यात आलं. समुद्रकिनारे स्वच्छ ठेवणं, आपल्या प्रत्येकाची जबाबदारी आहे. अनेक लोकप्रिय मंडळी समाजहिताच्या उपक्रमांना प्रोत्साहन देत असल्याचं 'बीच प्लीज इंडिया'ची उपाध्यक्षा पूनम सांगते. या उपक्रमात अभिनेत्री क्रांती रेडकर, अतिरिक्त आयुक्त समीर वानखेडे, युट्यूबर गौरव तनेजा यांनीदेखील सहभागी होत उपस्थितींचा उत्साह वाढवला.

**समुद्रकिनारे स्वच्छ करणं अत्यंत गरजेचं आहे. याने समुद्रातील जीवसुद्धा वाचतील. या उपक्रमांतर्गत फक्त मुंबईचे नाही तर इतर सगळे समुद्रकिनारे स्वच्छ व्हावेत, हाच आमचा प्रयत्न असेल.**

**- शोबना वासुदेवन,**
प्रिन्सिपल, पोदार कॉलेज

**एनिग्माचा पहिलाच उपक्रम इतका गरजेचा आणि आवश्यक आहे, हे इकडे आल्यावर सगळ्यांनाच जाणवलं. मी खूप खूश आहे की, हा उपक्रम आम्ही निवडला आणि त्याला विद्यार्थ्यांचाही उत्तम प्रतिसाद लाभला. आताच्या घडीला हा उपक्रम खूप महत्त्वाचा आहे.**

**- डॉ. अमृता पाटील,** प्राध्यापिका,
वाणिज्य शाखा, पोदार कॉलेज